जिपुअ/धाखनि/कक्ष-4/कावी-45-31/2021
जिल्हाधिकारी गोंदिया यांचे कार्यालय, गोंदिया
दिनांक- 30 मार्च 2021.

## महाराष्ट्र शासन
## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

### जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीबाबतची जाहिरात सुचना

ग्राहक संरक्षण अधिनियम 1986 मध्ये ग्राहकांच्या अधिकारांचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी जिल्हास्तरावरील जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेमधील अशासकीय सदस्यांच्या रिक्त पदांची संख्या व प्रवर्ग निश्चित करण्यात येत असुन शासन निर्णय क्रमांक ग्राराप/1013/प्र.क्र.119/ग्रा.सं.-2, दिनांक 19.10.2013 मध्ये पात्रतेचे निकष देण्यात आलेले आहे.सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असुन त्याचा सांकेतांक 201310191602526306 असा आहे.

गोंदिया जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर प्रवर्ग निहाय अशासकीय सदस्यांची नियुक्ती करावयाची असल्याने गोंदिया जिल्हयातील ईच्छुक संस्थाचे प्रतिनिधी व व्यक्ती यांचे कडुन अर्ज मागविण्यात येत आहे. प्रवर्ग निहाय अशासकीय सदस्यांचे नियुक्ती अर्ज दिनांक --6 मे 2021 पर्यंत जिल्हा पुरवठा अधिकारी गोंदिया यांचे कार्यालयात (कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस वगळता) वरील संदर्भिय शासन निर्णयानुसार विहीत निकषाची पुर्तता करुन परिशिष्ट अ व ब प्रमाणे नमुद केलेल्या मुळ कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतिसह सादर करावे. साक्षांकन हे केंद्र व राज्य शासनाचे राजपत्रीत अधिकारी यांचे असावे.
साक्षांकीत प्रति जोडलेल्या नसल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

**नियुक्त करावयाच्या अशासकीय सदस्यांच्या रिक्त पदांचा तपशिल**

| अ.क्र. | प्रवर्ग | नियुक्त करावयाच्या अशासकीय सदस्यांची संख्या |
|---|---|---|
| 1 | जिल्हा परिषद सदस्य | 2 पदे (1 पद महिला राखीव) |
| 1 | नगरपरिषद सदस्य | 2 पदे (1 पद महिला राखीव) |
| 2 | कृषी उत्पन्न बाजार समिती | 2 पदे (1 पद महिला राखीव) |
| 3 | ग्राहक संघटनेचे प्रतिनिधी | 10 पदे (2 पदे महिला राखीव) |
| 4 | व्यापार व उद्योग क्षेत्राचे प्रतिनिधी (प्रत्येकी एक) | 2 पदे |
| 5 | पेट्रोल व गॅस विक्रेत्यांचे प्रतिनिधी (प्रत्येकी एक) | 2 पदे |
| 6 | शेतकऱ्यांचे प्रतिनिधी | 2 पदे |
| 7 | शाळा व महाविद्यालयाचे प्रतिनिधी (प्रत्येकी एक) | 2 पदे |
| 8 | पंचायत समितीचे प्रतिनिधी | 2 पदे (1 पद महिला राखीव) |
| 9 | वैद्यक व्यवसायाचे | 2 पदे |

वरील बाबतची सर्व माहिती, अर्जाचा नमुना व शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. दिनांक -6 मे 2021 नंतर प्राप्त होणारे तसेच अपुर्ण अर्ज स्विकारण्यात येणार नाही, याबाबत कृपया नोंद घ्यावी.

(दीपक कुमार मीना)
जिल्हाधिकारी, गोंदिया